# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

विषयः- **करोना विषाणू (कोव्हीड-१९) चा संसर्ग होऊ नये व प्रादूर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेबाबत.**

संदर्भः-
१. D.O.No.Secy(HE) MHRD/2020 New Delhi, Dtd. 21st March, 2020
२. विद्यापीठ अनुदान आयोग क्र.F.No.I-14/2020(Website), Dtd.21/03/2020
३. जिल्हादंडाधिकारी व जिल्हाधिकारी कार्यालय यांचा आदेश क्र.कार्या-७/गृह/पोल/एसआर-०५/२०२०
४. सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे पत्र क्र.उशिसं/कोरोना/मवि-०१/२०२० /३८१९/४०४२, दि.२३/०३/२०२०
५. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांचे पत्र क्र.विसस/उशि/कोवि/२०२०/१२०३, दि.२३/०३/२०२०
६. विद्यापीठाचे परिपत्रक जा.क्र.आस्थापना/डब्ल्यु.एच.-०१ दि.२३/०३/२०२०
७. विद्यापीठाचे परिपत्रक जा.क्र.आस्थापना/८४९, दि.२३/०३/२०२०
८. गृह विभाग, भारत सरकार यांचे पत्र क्र.40-3/2020-DM-1(A) Dtd.24/03/2020
९. महसूल, वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.DMU/2020/CR.92/DisM-1, Dtd. 25/03/2020

उपरोक्त विषय संदर्भांकित पत्रांच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने करोना विषाणूचा संसर्ग होऊ नये व प्रादूर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेच्या दृष्टीने शासनाने विविध निर्गमित केलेल्या आदेशास अनुसरून विद्यापीठ अधिविभाग तसेच प्रशासकीय कामकाज हे पुढील आदेश होईपर्यंत बंद ठेवण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले होते.

याबाबत, संदर्भ क्र.८ अन्वये गृह विभाग, भारत सरकार तसेच संदर्भ क्र.९ अन्वये महाराष्ट शासन यांचेकडून नव्याने प्राप्त झालेल्या निर्देशास अनुसरून खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

विद्यापीठातील सर्व शैक्षणिक अधिविभाग, प्रशासकीय विभाग यांना करोना विषाणू (कोव्हीड-१९) चा संसर्ग होऊ नये व त्याचा प्रादूर्भाव व प्रसार वाढू नये याकरिता प्रतिबंधात्मक व तातडीची उपाययोजना म्हणून विद्यापीठातील शैक्षणिक अधिविभाग, प्रशासकीय विभाग हे दि.१४ एप्रिल, २०२० पर्यंत बंद राहतील. तथापी सदर कालावधीत अधिविभागप्रमुख/संचालक/ शिक्षक/ संशोधक/अधिकारी व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी घरी राहून (work from home) आवश्यक ते सर्व शैक्षणिक/प्रशासकीय कामकाज करावे व अधिसूचनेतील संबंधित निर्देशांचे काटेकोरपणे पालन करावे.

तसेच कार्यालयीन कामकाजाकरीता विद्यापीठ कार्यालयास एखाद्या शिक्षक/अधिकारी/ कर्मचाऱ्याची गरज भासल्यास अधिविभागप्रमुख/विभागप्रमुखांच्या आदेशानुसार संबंधित अधिविभागप्रमुख/ संचालक/ शिक्षक/ संशोधक/ अधिकारी व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी कार्यालयात उपस्थित राहणे बंधनकारक राहील, याची नोंद घ्यावी. त्याचप्रमाणे संदर्भ क्र.७ प्रमाणे अत्यावश्यक सेवेतील विभागांनी विद्यापीठातील सेवा सुरळीत चालू राहण्याबाबत योग्य ते नियोजन त्यांचे स्तरावर करावे.

**(डॉ.विलास द.नांदवडेकर)**
**कुलसचिव**

जा.क्र.आस्थापना/ ८५१
दिनांक : 28 MAR 2020

प्रति,

१. सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक
२. सर्व उपकुलसचिव, कायदा अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सहा.कुलसचिव व समकक्ष अधिकारी
३. सर्व प्रशासकीय विभागप्रमुख
४. मा.कुलगुरु, मा.प्र-कुलगुरू, कुलसचिव, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, वित्त व लेखा अधिकारी, यांच्या कार्यालयास माहितीसाठी.
५. इंटरनेट सेल - सदरचे परिपत्रक संकेतस्थळावर प्रसिध्द करावे. (INTRANET)